४५१

महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, वित्त विभाग,निर्णय क्रमांक.वाहन -२०२५/प्र.क्र १९/ विनियम, दि.१७/०९/२०२५

**विषय :-** शासकीय वाहनांचे किंमत मर्यादा धोरण

****

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, निर्णय क्रमांक. वाहन -२०२५/ प्र .क्र १९/ विनियम, दि.१७ /०९/ २०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०९१७१७००५२४८०५ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
PRAVIN MADHUKAR SHIKHARE
Date: 23-09-2025 10:35:19

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था/ नियोजन व समन्वय/आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके),



Scanned with CamScanner

महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.

सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

<u>शासकीय वाहनांचे किंमत मर्यादा धोरण</u>

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांकः वाहन २०२५ / प्र.क्र.१९ / विनियम
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १७ सप्टेंबर,२०२५

<u>वाचा :</u>

१) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वाहन-२०२४ / प्र.क्र.११ / विनियम, दि.०२.०२.२०२४

२) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक एमव्हीआर-०१२५ / प्र.क्र.१३ / परि-२, दि.२३.०५.२०२५

<u>प्रस्तावना :</u>

उक्त 'वाचा' मधील अनुक्रमांक १ येथील दि.०२.०२.२०२४ च्या शासन निर्णयान्वये शासनाचे विविध पदाधिकारी / अधिकारी यांना त्यांच्या दर्जानुसार शासकीय वाहन खरेदीकरीता असलेली किंमत मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. सदर वाहन किंमत मर्यादा धोरण निश्चितीनंतर गेल्या वर्षभरात वाहनांच्या उत्पादन खर्चात झालेली वाढ, दरम्यानच्या काळात झालेला चलन फुगवटा, नवीन बीएस-६ (BS IV) वाहनांच्या संदर्भातील तांत्रिक बदल व अद्ययावत वैशिष्ट्ये यामुळे वाहन किंमत मर्यादेत वाढ करण्याची आवश्यकता असल्याने संदर्भिय शासन निर्णय दि.०२.०२.२०२४ मध्ये सुधारणा करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. यासंदर्भात सविस्तर विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय:</u>

नवीन शासकीय वाहन खरेदी किंवा निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहन खरेदी करताना विविध पदाधिकारी / शासकीय अधिकारी यांच्याकरीता खालील किंमत मर्यादेतील वाहन त्यांच्या दर्जानुसार शासकीय वाहन म्हणून अनुज्ञेय राहील.



Scanned with CamScanner

| अ.क्र. | पदाधिकारी/अधिकारी यांची पदनामे | वाहनांचा प्रकार | किंमत मर्यादा (वस्तू व सेवा कर, मोटार वाहन कर व नोंदणी शुल्क वगळून) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | • मा.राज्यपाल,<br>• मा.मुख्यमंत्री,<br>• मा.उपमुख्यमंत्री,<br>• मा.मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय,<br>• मा.लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य. | संबंधितांच्या पसंतीनुसार. | मर्यादा नाही |
| २. | • राज्यातील जिल्ह्यांमध्ये दौऱ्यावर येणारे मा.मंत्रीमंडळ सदस्य तसेच राज्य अतिथी यांच्या परिवहन व्यवस्थेसाठी,<br>• मा.कॅबिनेट मंत्री,<br>• मा.उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, मा.उप लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य,<br>• मा.राज्यमंत्री,<br>• मा.राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक कार्यालयास मा. राज्यपाल महोदयांच्या ताफ्यासाठी वाहने,<br>• मा. मुख्य सचिव. | संबंधितांच्या पसंतीनुसार. तथापि, स्तंभ -४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विनिर्दिष्ट किंमत मर्यादेत. | ₹ ३०.०० लक्ष |
| ३. | • मा.महाधिवक्ता,<br>• मा.मुख्य माहिती आयुक्त,<br>• मा.अध्यक्ष महाराष्ट्र लोकसेवा आयोग,<br>• मा.राज्य निवडणूक आयुक्त,<br>• मा.राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त<br>• मा.अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (मंत्रालयीन विभाग). | संबंधितांच्या पसंतीनुसार. तथापि, स्तंभ -४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विनिर्दिष्ट किंमत मर्यादेत. | ₹ २५.०० लक्ष |
| ४. | • राज्य माहिती आयुक्त,<br>• सदस्य, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,<br>• राज्य सेवा हक्क आयुक्त. | संबंधितांच्या पसंतीनुसार. तथापि, स्तंभ -४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विनिर्दिष्ट किंमत मर्यादेत. | ₹ २०.०० लक्ष |
| ५. | • राज्यातील सर्व विभागांचे राज्य स्तरीय विभागप्रमुख (उदा.आयुक्त/महासंचालक/संचालक),<br>• विभागीय आयुक्त,<br>• परिक्षेत्राचे पोलीस महानिरिक्षक,<br>• प्रधान मुख्य वनसंरक्षक<br>(समकक्ष अधिकारी अंतर्भूत नाहीत.). | संबंधितांच्या पसंतीनुसार. तथापि, स्तंभ -४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विनिर्दिष्ट किंमत मर्यादेत.. | ₹ १७.०० लक्ष |



Scanned with CamScanner

| अ.क्र. | पदाधिकारी/अधिकारी यांची पदनामे | वाहनांचा प्रकार | किंमत मर्यादा (वस्तू व सेवा कर, मोटार वाहन कर व नोंदणी शुल्क वगळून) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| ६. | • जिल्हाधिकारी,<br>• मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>• पोलीस आयुक्त,<br>• जिल्हा पोलीस अधीक्षक व त्यावरील पोलीस संवर्गातील अधिकारी<br>• अपर जिल्हाधिकारी<br>• प्रमुख जिल्हा न्यायाधीश,<br>• महाप्रबंधक / प्रबंधक मा.उच्च न्यायालय, मुंबई,<br>(समकक्ष अधिकारी अंतर्भूत नाहीत.) | संबंधितांच्या पसंतीनुसार. तथापि, स्तंभ -४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विनिर्दिष्ट किंमत मर्यादेत. | ₹ १५.०० लक्ष |
| ७. | राज्य स्तरीय वाहन आढावा समितीने वाहन अनुज्ञेय केलेले इतर अधिकारी * | संबंधितांच्या पसंतीनुसार. तथापि, स्तंभ -४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विनिर्दिष्ट किंमत मर्यादेत. | ₹ १२.०० लक्ष |

[*आपत्ती व्यवस्थापन कार्यात सहभागी असणाऱ्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना उक्त तक्त्यातील अनुक्रमांक ७ समोर नमूद किंमत मर्यादेत बहूपयोगी वाहने {MUV (Multi Utility Vehicle)} खरेदी करता येतील.]

**२. उक्त तक्त्यातील स्तंभ ४ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या वाहन किंमत मर्यादेत वस्तू व सेवा कर, मोटार वाहन कर व नोंदणी शुल्काचा अंतर्भाव करण्यात आलेला नाही.**

**३. उपरोक्त वाचा मधील अनुक्रमांक २ येथील दि.२३.०५.२०२५ च्या शासन निर्णयानुसार जाहीर करण्यात आलेल्या इलेक्ट्रिक वाहन धोरण-२०२५ अन्वये शासनाने इलेक्ट्रिक वाहन वापराच्या प्रमाणात वाढ करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले असल्याने शासकीय विभागांमध्ये इलेक्ट्रिक वाहन वापरास प्रोत्साहन देण्याकरीता उक्त तक्त्यातील स्तंभ-४ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या किंमत मर्यादेपेक्षा २०% अधिक किंमतीची इलेक्ट्रिक वाहने खरेदी करण्यास मुभा राहील.**

४. अनुज्ञेय वाहन खरेदी करताना आपल्या कार्यक्षेत्रात सदर वाहनाच्या देखभाल व दुरुस्तीची सुविधा तसेच वाहनाच्या सुटया भागांची (Spare Parts) उपलब्धता समाधानकारक असल्याची खातरजमा करावी.

५. वित्त विभागाचा वाहन विषयक शासन निर्णय, क्रमांक वाहन-१०००/प्र.क्र.६५/२००१/विनियम, दि.१०.०९.२००१ नुसार वाहनांची अनुज्ञेयता राज्य स्तरीय वाहन आढावा समिती निश्चित करेल. वाहन आढाव्याअंती मंजूर झालेल्या वाहनांपैकी, सर्व विहित अटींची पूर्तता करुन निर्लेखित झालेल्या वाहनांच्या बदल्यात नवीन वाहन खरेदीचे प्रस्ताव, राज्यस्तरीय वाहन आढावा समितीसमोर सादर न करता



Scanned with CamScanner

यथास्थिती क्षेत्रीय कार्यालयांच्या बाबतीत संबंधित राज्यस्तरीय विभागप्रमुखांच्या स्तरावर आणि मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या बाबतीत संबधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या प्रमुखांच्या स्तरावर मान्य करण्यात येतील.

**अशाप्रकारे अनुज्ञेय असलेल्या निर्लेखित वाहनाच्या बदली नवीन वाहन खरेदीस मान्यता प्रदान करताना यथास्थिती मंत्रालयीन प्रशासकीय विभागप्रमुखांनी आणि राज्यस्तरीय विभागप्रमुखांनी सदर निर्लेखित वाहनाचा, वाहन आढाव्यामध्ये समावेश असल्याची खात्री करावी. तसेच एकदा निर्लेखित केलेल्या वाहनाच्या बदली दुबार वाहन खरेदी केले जाणार नाही, याबाबत यथास्थिती संबधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागप्रमुखांनी आणि राज्यस्तरीय विभागप्रमुखांनी दक्षता घ्यावी. निर्लेखित वाहन आणि त्याबदली खरेदी करण्यात आलेले नवीन वाहन यासंदर्भातील नोंदी महावाहन संगणक प्रणालीवर अद्ययावत करण्यात आल्याची खात्री देखील यथास्थिती संबधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागप्रमुखांनी आणि राज्यस्तरीय विभागप्रमुखांनी करणे अनिवार्य राहील. तसेच याबाबतचे स्वयंस्पष्ट व वस्तूनिष्ठ प्रमाणपत्र देयकासोबत सादर केल्याशिवाय वाहन खरेदीचे देयक संबधित जिल्हा कोषागार अधिकारी / अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचेकडून पारित केले जाणार नाही.**

अत: निर्लेखित वाहनाच्या बदली नवीन वाहन खरेदी करताना कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही, हे सुनिश्चित करण्याची सर्वस्वी जबाबदारी यथास्थिती संबधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागप्रमुखांची आणि राज्यस्तरीय विभागप्रमुखांची राहील. कोणत्याही परिस्थितीत वाहन आढाव्यामध्ये समाविष्ट नसलेले वाहन निर्लेखित करून त्याबदली नवीन वाहन खरेदी करण्यात येऊ नये.

६. वाहन आढावा झालेला नसेल तेव्हा नवीन वाहन खरेदी / अनुज्ञेय करताना राज्य स्तरीय वाहन आढावा समितीची मान्यता घेणे अनिवार्य राहील. त्याचप्रमाणे राज्यस्तरीय वाहन आढावा समितीसमोर वाहन आढाव्याचे प्रस्ताव पाठविण्यापूर्वी संबंधित विभागाकडील / कार्यालयातील सर्व वाहनांची अद्ययावत माहिती शासनाच्या https://mahavahan.maharashtra.gov.in (महावाहन संगणक प्रणाली) या संकेतस्थळावर भरण्यात आलेली असावी अन्यथा आढाव्याच्या प्रस्तावांवर समितीकडून विचार करण्यात येणार नाही.

७. संबंधित पदाधिकारी/अधिकारी यांच्या वापरातील जुने वाहन, नियमांमधील निकषांनुसार निर्लेखित झाल्यानंतरच या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या किंमत मर्यादेत उपरोक्त परिच्छेद ५ येथे नमूद केल्यानुसार योग्य व सक्षम स्तरावर मान्यता घेऊनच निर्लेखित वाहनाच्या बदली वाहन खरेदी करता येईल. वापरातील वाहन निर्लेखन योग्य नसल्यास कोणत्याही परिस्थितीत त्याबदल्यात "विशेष बाब" म्हणून नवीन वाहन खरेदीस मान्यता देण्यात येणार नाही.

८. वरील शासन निर्णयान्वये केलेल्या तरतूदी स्वायत्त संस्था / सार्वजनिक क्षेत्रातील सर्व उपक्रम / मंडळे / महामंडळे यांना लागू राहतील. हे आदेश सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या



Scanned with CamScanner

नियंत्रणाखालील सर्व स्वायत्त संस्था / सार्वजनिक क्षेत्रातील सर्व उपक्रम / मंडळे / महामंडळे यांच्या निर्देशनास तात्काळ आणावेत व त्याची प्रत वित्त विभागास पृष्ठांकित करावी.

९. यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले वाहनांच्या किंमत मर्यादेबाबतचे आदेश **अधिक्रमित** करुन सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

१०. या शासन निर्णयाची अंमलबजावणी या आदेशाच्या दिनांकापासून करण्यात येईल.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०९१७१७००५२४८०५ असा आहे. प्रस्तुत शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA
UTTAMRAO GADEKAR

Digitally signed by RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=b8e8c3a034acb70f16af6f81c69ca038ff6f25ff78cfc9e6d815fd95b5367b07, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=37a42e182bace4c129abbeb54e27836d32d401560638f644a547867205474ee5, cn=RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
Date: 2025.09.17 17:01:39 +05'30'

**( डॉ.राजेंद्र सुमन उत्तमराव गाडेकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. सर्व सन्माननीय विधान परिषद, विधानसभा व संसद सदस्य.
७. मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभाग,
९. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा / अपील शाखा), मुंबई,
१०. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र,मुंबई,
११. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१४. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
१५. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,



Scanned with CamScanner

१८. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१९. प्रमुख न्यायाधिश, कुटुंब न्यायालय,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/अकोला/अमरावती/ठाणे/नाशिक/ सोलापूर / मुंबई,
२०. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
२१. सर्व विभागीय आयुक्त,
२२. सर्व जिल्हाधिकारी,
२३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२४. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
२५. सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण/ पुणे /नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती,
२६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२७. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई,
२८. सर्व कोषागार अधिकारी
२९. मंत्रालयाच्या सर्व प्रशासनिक विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख आणि कार्यालय प्रमुख,
३०. वित्त विभागातील सर्व कार्यासने,
३१. निवड नस्ती, विनियम, वित्त विभाग.



Scanned with CamScanner